संत मुक्ताई पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी आरोग्य विभाग सज्ज >>पान 2

क्युबेक सोबतच्या भागीदारीतून राज्यात मोठी गुंतवणूक होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

लोकसंख्या वाढते, नोकऱ्या कमी होतात; विधानसभेत सरकारच्या रोजगार धोरणावर आमदार सिद्धार्थ खरात यांचा जोरदार प्रहार >>पान 4

**सुविचार**

बदला घेण्यापेक्षा स्वत:ला बदलणे जास्त फायद्याचे आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची जयंती 'जलसंधारण दिन' म्हणून साजरी करणार

आतील पान


■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 01 ■ शनिवार, दि. 04 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


# राज्यात पावसाचा जोर; सोमवारपर्यंत मुसळधार

## पेरणी कामाला वेग : अनेक घाटांत दरडी कोसळल्या; वाहतुकीला फटका, ठिकठिकाणी जनजीवन विस्कळित

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/पुणे। प्रतिनिधी :** अरबी समुद्रात तब्बल १५ दिवस रेंगाळल्यानंतर मान्सूनने आता संपूर्ण राज्यात दमदार हजेरी लावली आहे. रखडलेल्या पेरण्यांना वेग आल्याने बळीराजा सुखावला आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस सुरू असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने रायगड आणि पुण्याला 'रेड अलर्ट' तर मुंबई, ठाणे आणि पालघरला 'ऑरेंज अलर्ट' जारी केला असून नागरिकांना अत्यंत महत्त्वाच्या कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. जुलैच्या पहिल्याच दिवसापासून सुरू झालेल्या या दमदार पावसामुळे राज्यातील रखडलेल्या पेरणीच्या कामांना आता गती आली आहे. गेल्या दोन दिवसांपासून रात्रभर कोसळणाऱ्या पावसामुळे मुंबईच्या



सखल भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे.

**असे आहेत अलर्ट**

– आजपासून पुढील आठवडाभर (८ जुलैपर्यंत) मुंबईसह संपूर्ण कोकण, विदर्भ, खानदेश, नाशिक, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे.

– कोकणातील पालघर, ठाणे, मुंबईसह रायगड, रत्नागिरी तसेच नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांतील घाट (त्र्यंबकेश्र्वर, घोटी, इगतपुरी, कसारा, भंडारदरा, भीमाशंकर, लोणावळा, खंडाळा, मावळ, मुळशी, वेल्हे, भोर, ताम्हिणी, नाणेघाट, पोलादपूर, महाबळेश्र्वर, पाचगणी, कुंभार्ली घाट, कोयना, आंबा, गगनबावडा, राधानगरी) क्षेत्रांत जोरदार पावसाचा अंदाज आहे.

कोल्हापूर आणि सिंधुदुर्गला जोडणार्या करूळ घाटात शुक्रवारी दुपारी १२.३०च्या सुमारास भली मोठी दरड कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक सुमारे दोन तास पूर्णपणे ठप्प झाली. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले.

सततच्या मुसळधार पावसामुळे संगमेश्वर तालुक्यातील आंबा घाटात शुक्रवारी सकाळी पुन्हा मोठी दरड कोसळल्याने रत्नागिरी–नागपूर महामार्गावरील वाहतूक काही काळ मंदावली.

गेले चार दिवस कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे आंबोलीचा मुख्य धबधबा आता पूर्ण क्षमतेने कोसळू लागला आहे. याबरोबरच घाटमार्ग व परिसरातील सर्वच धबधबे प्रवाहित झाले आहेत. या पार्श्र्वभूमीवर येणाऱ्या ४ जुलै या पहिल्या शनिवारपासून आंबोलीच्या वर्षा पर्यटनास प्रारंभ होत आहे.

### कोकण, मध्य महाराष्ट्राला सोमवारपर्यंत 'रेड अलर्ट'

कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भाला ६ जुलैपर्यंत अतिवृष्टीचा 'रेड अलर्ट' देण्यात आला आहे. मराठवाड्यात मात्र हलका ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. राज्यात शुक्रवारी (दि. ३) बहुतांश भागात संततधार पावसाची नोंद झाली, तर कोकणासह मुंबई आणि घाटमाथ्यावर अतिवृष्टीची नोंद झाली. राज्यात सोमवार (६ जुलै) पर्यंत जोरदार पावसाचा अंदाज आहे. कोकणात ९ जुलै, मध्य महाराष्ट्राला ६ जुलै, तर विदर्भाला ८ जुलैपर्यंत मुसळधारेचा अंदाज देण्यात आला आहे.

# आता शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंक्स विक्रीवर बंदी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्र सरकारने राज्यातील शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंक विक्री करण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे अन्न आणि प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत बोलताना याबाबतची माहिती दिली आहे. त्यांनी सांगितलं की शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग विक्रीवर बंदी घालण्यात येणार आहे.

सरकारने हा निर्णय मुले आणि तरूण या ड्रिंक्सच्या आहारी जात असल्याने त्यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून घेतला आहे. संबंधित आदेश हा याबाबतच्या विभागांना लवकरच पाठवण्यात येणार आहे. या नियमाचे पालन होत आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी करडी नजर ठेवली जाईल.




महाराष्ट्राचे पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरू आहे. यावेळी आज आमदार विक्रम पाचपुते यांनी याबाबतचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. यावेळी त्यांनी 'सभापती नार्वेकर यांना स्टिंगचे सॅम्पल दाखवून यात कॅफेन, टोरेन आणि शुरगचे प्रमाण हे जरी नियमात बसणारं असलं तरी या सर्वांचे कॉम्बिनेशन हे डेडली आहे. याचे मुलांना व्यसन लागते. उत्पादक स्वतः हे मुलांसाठी आणि गर्भवती महिलांसाठी योग्य नाहीये असं मान्य करतात. हे असं असलं तरी हे सरास शाळांच्या जवळ मिळते. याबाबत मंत्री महोदय कारवाईचे आदेश देणार का असा प्रश्न विचारला होता.'

या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आम्ही प्राथमिक शिक्षक, पालकांना देखील याबाबत शाळांच्या आवारात मुलांना हे व्यसनाधीनतेकडे नेणारे पदार्थ न देण्याचे आवाहन केलं असून शाळांच्या ५०० मीटर परिसरात असे पदार्थ आढळून आले तर कारवाई करण्यात येईल असे निर्देश देण्यात आल्याचे देखील सांगितलं.

## एसटी महामंडळाची ई-बस चोरली; चार्जिंग संपली अन्..गेम झाला, एका चीपमुळे सापडले २० गुन्हे असलेल्या तेलंगणाच्या चोराच लोकेशन

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर । प्रतिनिधी :** नागपुरातून चक्क दीड कोटी रुपयांची एसटी महामंडळाची इलेक्ट्रिक बस चोरीला गेल्याची एक अजब आणि तितकीच धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपूरच्या बसस्थानकातून चोरी झालेली ही 'शिवाई' बस अमरावतीच्या राजापेठ पोलिसांनी चोरट्यासह पकडली केली आहे. अटक करण्यात आलेल्या या आंतरराज्यीय चोरट्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि त्याने दिलेली माहिती ऐकून स्वत: पोलीसही चक्रावून गेले आहेत.

१ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास नागपूरमधील इमामवाडा बसस्थानकातील चार्जिंग स्टेशनवर 'एमएच ४९ बी. झेड. ८२५८' क्रमांकाची 'शिवाई' इलेक्ट्रिक बस उभी होती. यावेळी चोराने सुरक्षा यंत्रणेला गुंगारा देत तब्बल १ कोटी ५३ लाख रुपये किमतीची ही बस तिथून पळवून नेली. एसटी महामंडळाची बस चोरीला गेल्याने पोलिसांची मोठी धावपळ उडाली होती. दरम्यान, अमरावती शहरातील राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नंदा मार्केटजवळ एक संशयास्पद बस उभी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## एचएसआरपी न बसवलेल्या वाहनांवर कारवाई

**कोल्हापूर । प्रतिनिधी :** १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. याबाबत वारंवार मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत ३० जून रोजी संपुष्टात आली आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील वाहनांनाही एचएसआरपी बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, ज्या वाहनधारकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी आगाऊ शुल्क भरून अपॉइंटमेंट घेतली आहे किंवा १ जुलै नंतरही एचएसआरपी साठी शुल्क भरल्याची वैध पावती सादर केली आहे, अशा वाहनधारकांना कारवाईतून सूट देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. एचएसआरपी शिवाय वापरात असलेल्या वाहनांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी मनोज ओतारी यांनी दिला आहे.




# इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे मायलेज कमी होते; केंद्र सरकारची कबुली

### घाबरण्याचे कारण नाही : पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी

नवी दिल्ली : पर्यावरणपूरक इंधनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून ई-२० (२० टक्के इथेनॉलमिश्रित) पेट्रोलचा वापर वाढवला जात आहे. मात्र, या इंधनामुळे वाहनांच्या मायलेजवर किंचित परिणाम होऊ शकतो, अशी कबुली केंद्र सरकारने पहिल्यांदाच दिली आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुमंत्री हरदीपसिंग पुरी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मात्र, मायलेजमधील ही घट किंचित असेल आणि ती केवळ




इथेनॉलमुळेच नाही, तर इतर अनेक घटकांवरही अवलंबून असू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुरी यांनी मायलेजबाबत सांगितले की, इथेनॉलचा वापर रेसिंग कार्समध्येही केला जात आहे. यामुळे वाहनांचे पिकअप सुधारते आणि इंजिनमधील 'नॉकिंग'ची समस्याही कमी होते. त्यामुळे मायलेजमध्ये जर थोडी घट झाली, तर त्याला कारमधील काही तांत्रिक गोष्टी, ड्रायव्हिंगची पद्धत, असे इतर अनेक घटक कारणीभूत असू शकतात. >>पान २

# धुळ्यात ठाकरे गटाला मोठा धक्का!

## उपनेत्या शुभांगी पाटील यांचा शिंदे शिवसेनेत जाहीर प्रवेश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील ऑपरेशन टायगर पुन्हा एकदा चर्चेत आले असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला उत्तर महाराष्ट्रात मोठा धक्का बसला आहे. धुळ्यातील ठाकरे गटाच्या उपनेत्या तसेच उत्तर महाराष्ट्र महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख शुभांगी पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

आज मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभांगी पाटील आपल्या शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसह शिवसेनेत अधिकृत प्रवेश करणार आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे धुळे



जिल्ह्यासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील ठाकरे गटाला मोठे खिंडार पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा ऑपरेशन टायगरची चर्चा सुरू असताना झालेला हा पक्षप्रवेश विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि उत्तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांवर या घडामोडींचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, शुभांगी पाटील यांच्या पक्षप्रवेशानंतर ठाकरे गटाची पुढील भूमिका काय असेल आणि उत्तर महाराष्ट्रातील राजकारणाला कोणते नवे वळण मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्वखर्चातून ६७ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप; नगरसेविका रूपाली गारोळे यांचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर । प्रतिनिधी :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने मेहकर नगरपरिषद मराठी प्राथमिक शाळा क्रमांक ६ येथे नगरसेविका सौ. रूपाली किशोर गारोळे यांनी स्वखर्चातून ६७ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७ निमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना सौ. गारोळे यांनी शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम असून प्रत्येक विद्यार्थ्याने मन लावून शिक्षण घेऊन आपल्या पालकांचे, शाळेचे आणि शहराचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात हे नवीन शैक्षणिक वर्ष ज्ञान, संस्कार आणि यशाचा नवा अध्याय ठरो, अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली.

मेहकर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष किशोर गारोळे हे सामाजिक, शैक्षणिक व लोकहिताच्या उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय राहून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात. त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा आता त्यांच्या पत्नी तथा नगरसेविका सौ. रूपाली किशोर गारोळेही समर्थपणे पुढे नेत असल्याचे या उपक्रमातून दिसून आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून स्वखर्चातून स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांनी समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली. त्यामुळे मेहकर शहरात सामाजिक कार्यात त्यांची वाढती सक्रियता चर्चेचा विषय ठरत आहे.






विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे कार्यक्रमाला उत्सवी वातावरण लाभले. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगराध्यक्ष किशोर गारोळे व नगरसेविका सौ. रूपाली गारोळे या दाम्पत्याच्या समाजाभिमुख कार्याचे उपस्थितांनी कौतुक करत, शिक्षणाला प्रोत्साहन देणारे असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## कालबाह्य विचार..

शरद पवार यांच्या जन्माच्या कित्येक शतके आधीपासून पंढरपूरची वारी सुरू होती आणि त्यांच्या पश्चात अनेक शतकेही ती तशीच सुरू राहील. या वारीचे स्वरूप धार्मिक आहे की अन्य काही, ते सांगण्याची उठाठेव पवार यांनी करूच नये. कारण, पवार यांचे विचार आणि ते स्वत: आजच्या पिढीसाठी कालबाह्य झाले आहेत. ही वारी समतेची शिकवण देणारी आहेच; पण तिचे अधिष्ठान हे देखील धार्मिकच आहे, हे जरी पवारांना समजले, तरी त्यांचा जन्म सफल होईल. वसंत ऋतूची चाहूल लागली की, कोकिळाला कंठ फुटतो म्हणतात. त्याच्या मंजूळ आवाजाने ऋतुबदलाचे शुभसंकेतही मिळतात. पण, कावळा काव-काव करू लागला की, लोकांच्या कपाळावर नापसंतीच्या आठ्याच पडतात. त्याचप्रमाणे हिंदू सणवारांचे दिवस आले की, काही नाठाळ आणि नास्तिकांनाही कंठ फुटतो. अर्थात, त्यांच्याकडे सामान्य माणूस फारसे लक्ष देत नाही, तो भाग अलाहिदा. या गटातील लोकांमध्ये राजकीयदृष्ट्या कालबाह्य ठरलेल्या नेत्यांचा समावेशच अधिक असतो. कारण, आपण काही वादग्रस्त वक्तव्ये केली नाहीत, तर आपली कोणी दखलही घेणार नाही, हे त्यांना पक्के ठाऊक असते. म्हणूनच, गरज असो-नसो किंवा आपल्या वक्तव्यात काही तथ्य असो-नसो, ते नियमितपणे आपली हास्यास्पद वक्तव्ये करीत राहतात. माजी मुख्यमंत्री शरद पवार यांचा समावेश आता अशाच लोकांमध्ये होतो. त्यांनी पंढरपूरच्या वारीसंबंधी केलेली वक्तव्ये याच दृष्टिकोनातून पाहावी लागतील, अन्यथा त्यांच्या या वक्तव्यांचे काहीही महत्त्व नाही. आकुड येथील एका कार्यक्रमात पवार यांनी नुकतेच असे विधान केले की, महाराष्ट्राची खरी ओळख मंदिराच्या कळसात नाही; तर ज्ञान, समता, करुणा यांच्या अखंड परंपरेत आहे. संतांचा वारसा हा केवळ आध्यात्मिक नसून, लोकशाही मूल्यांचा आहे. पवार यांनी अप्रत्यक्षपणे वारीतील हिंदू धर्माचा आधारच डावलण्याचा प्रयत्न केला. गेल्या काही वर्षांपासून पवार यांनी, पंढरपूरच्या वारीसंबंधी वादग्रस्त वक्तव्ये करण्याचा सपाटाच लावला आहे. तो करताना त्यांनी सातत्याने हिंदू धर्माला लक्ष्य केले. आताही वारीचा वारसा हा आध्यात्मिक नसून समतेचा आसल्याचे सांगणे, हा त्यातील हिंदुत्वाला डावलण्याचाच केविलवाणा प्रयत्न आहे. पंढरपूरची वारी ही समतेची शिकवण देणारी निश्र्चितच आहे. पण, ही समता धार्मिक अधिष्ठानावर अधारित आहे. समाजातील कोणत्याही जातीतील व्यक्तीला ईश्र्वरभक्ती करण्याचा अधिकार आहे, हे संतांनी याच वारीतून दाखवून दिले. केवळ ब्राह्मणच नव्हे; तर कुंभार, माळी, शिंपी, वैश्य-वाणी अशा सर्व जातींतील लोक त्यात एकरूप होतात. वारीत कधीच शिवाशिव पाळली जात नव्हती आणि नाही. संतांची समतेची ही शिकवण, अनेक पिढ्यांपासून मराठी माणसाच्या रक्तात भिनली आहे. ती कोणी मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाही. आजकाल काही सुशिक्षित, पांढरपेशे लोक या वारीत एका मर्यादित टप्प्यापुरते सहभागी होतात आणि पूर्ण वारीचा अनुभव घेतात. पवार यांचा वारीत आजवर इतकाही सहभाग कधी दिसलेला नाही. तेव्हा अशा नेत्यांनी या वारीचा हेतू काय, तिचे स्वरूप काय वगैरे गोष्टींची उठाठेव करण्याच्या भानगडीत पडूच नये. कारण, वारकऱ्यांना त्यांच्या मताशी काहीही देणेघेणे नाही. ते आपल्या विष्णुनामात तल्लीन आहेत आणि राहतील. सामान्य लोकांना पवारांच्या वक्तव्यात आता काही स्वारस्य राहिलेले नाही. कारण, ते आता कालबाह्य झाले आहेत. वारीने समतेचे तत्त्व प्रत्यक्षात उतरविले असले, तरी तिचा मूळ हेतू विठ्ठलभक्तीचाच आहे. तिचे अधिष्ठानही धार्मिकच आहे. त्यामुळे पवार काहीही म्हणाले, तरी त्याने वारकऱ्यांना काही फरक पडत नाही. पण, अशा वक्तव्यांनी आपण हिंदूविरोधी आहोत, हे पवार पुन्हापुन्हा दाखवून देतात. 'अजूनही संत तुकाराम यांचे सदेह वैकुंठगमन झाल्याचे आपल्याला मान्य नाही,' असे ते सांगतात. वारकऱ्यांना हिंदू धर्मापासून वेगळे पाडण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. म्हणूनच, 'राष्ट्रीय वारकरी परिषदे'ने, त्यांना यापुढे कोणत्याही कार्यक्रमात निमंत्रण देण्यासच मनाई करण्याचे काही वर्षांपूर्वीच आवाहन केले आहे. वारकऱ्यांच्या विरोधात वक्तव्ये करणेही पवारांसाठी नवीन नाही. किंबहुना, अशी वक्तव्ये करूनच पवार समाजात फूट पाडण्याचे कामच करीत असतात. काही दिवसांपूर्वी राज्यातील ६० टक्के वारकरी हे धर्मांध विचारसरणीचे असल्याचेही, पवारांनी म्हटले होते. स्वत:ला 'नास्तिक' म्हणवून घेत असले, तरी पवार हे पक्के जातीयवादी मनोवृत्तीचे नेते आहेत. समतेचे राजकारण करण्याचा आग्रह धरणाऱ्या पवारांनीच, राज्यातील राजकारणात ब्राह्मणद्वेषाचे बीज पेरले. राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने, आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूर मंदिरात प्रथम पूजेचा मान मुख्यमंत्र्यांचा असतो. पवार यांनी अनेकदा हा मान उपभोगूनही त्यांना या वारीचे मर्म अजूनही समजले नसेल; तर त्यांची पूजा हा नुसताच उपचार होता, असे म्हणावे लागते. भर वारीतही पवार कोरडेच राहिले, असे म्हणावे लागते. शरद पवार यांच्या पक्षाला सामान्य जनतेने साफ धिक्कारले आहे. राजकीयदृष्ट्या अक्षम ठरले असतानाही राज्यसभेचे सदस्यत्व मिळविण्याची लालसा काही या माणसाच्या मनातून सुटलेली नाही. राजकीय दिवाळखोरीत गेलेल्या पवार यांना अधूनमधून राजकारणात आपणही अजून आहोत, हे दाखविण्याची खुमखुमी येते. वादग्रस्त वक्तव्ये केली नाहीत, तर आपली कोणीच दखल घेणार नाही, या समजुतीमुळे ते अशी वादग्रस्त वक्तव्ये करीत असतात. पण, पवार स्वत: आणि त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी कालबाह्य झाले आहेत. ते काय बोलतात, याकडे लक्षही देण्याची गरज आजच्या पिढीला वाटत नाही. इतके जरी पवार यांना समजले, तरी ते आपली उरलीसुरली शान राखून ठेवतील.

# संत मुक्ताई पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी आरोग्य विभाग सज्ज

## ▌ उपचार केंद्रे, रुग्णवाहिका व फिरती वैद्यकीय पथके तैनात
## ▌ अंढेरा फाटा ते देऊळगाव माहीदरम्यान व्यापक आरोग्य सुविधा
## ▌ आपत्कालीन सेवांसह रोगप्रतिबंधक उपाययोजनांवर भर

**दैनिक आपला विदर्भ**










**बुलढाणा । प्रतिनिधी :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत मुक्ताई पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना अखंड, तातडीची आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले आहे. अंढेरा फाटा ते देऊळगाव माही या पालखी मार्गावर आरोग्य उपचार केंद्रे, रुग्णवाहिका, फिरती वैद्यकीय पथके, आरोग्यदूत, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच रोगप्रतिबंधक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांच्या नियोजनानुसार आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सदानंद बन्सोड यांच्या सूचनेनुसार संपूर्ण तालुक्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

पालखी मार्गावरील आरोग्य पथकांकडून वारकऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी, आवश्यक औषधोपचार, आपत्कालीन वैद्यकीय सेवा तसेच उष्माघात, संसर्गजन्य व पाणीजन्य आजारांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला त्वरित प्रतिसाद देता यावा यासाठी रुग्णवाहिका आणि प्रशिक्षित आरोग्य कर्मचारीही सज्ज ठेवण्यात आले आहेत.

या सेवेमध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानंद शिंगाडे, डॉ. मयुरी पाडुळे, समुदाय आरोग्य अधिकारी वैभव लहाने, डॉ. सीमा जाधव, तालुका आरोग्य सहाय्यक प्रभाकर लबडे, गजानन नागरे, शिवाजी वाघ, यश चांदुरे, सुयश वाघमारे, अंकुश डोके, विजय झिने, आरोग्य सेविका संगीता पराड, ॲम्बुलन्स चालक देवानंद खराडे तसेच आशा स्वयंसेविका वर्षा नागरे प्रत्यक्ष पालखी मार्गावर कार्यरत असून वारकऱ्यांना आवश्यक आरोग्य सेवा पुरवत आहेत. वारकऱ्यांना सुरक्षित, निरोगी आणि सुखकर वारीचा अनुभव मिळावा, यासाठी आरोग्य विभागाकडून सर्व आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने दिली आहे.

# उघड्या मॅनहोल्समुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करा

## स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** पावसाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील उघडे किंवा नादुरुस्त मॅनहोल्स, साचलेले पाणी आणि त्यातून बालकांच्या जीवितास निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती व संबंधित स्थानिक प्रशासनाला तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, करण्यात आलेल्या कार्यवाहीचा ॲक्शन टेकन रिपोर्ट सात दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी रस्त्यांवरील तसेच गृहनिर्माण संस्थांच्या परिसरातील मॅनहोल्स उघड्या किंवा तुटलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने साचलेल्या पाण्यामुळे उघडे मॅनहोल्स दिसून येत नसल्याने नागरिकांच्या, विशेषतः



बालकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होत आहे. यापूर्वी अशा घटनांमध्ये बालकांचा मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या आहेत.या पार्श्र्वभूमीवर आयोगाने स्थानिक प्रशासनाला पुढील उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यक्षेत्रातील सर्व मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, पदपथ तसेच शाळा व अंगणवाड्यांच्या परिसरातील उघड्या किंवा नादुरुस्त मॅनहोल्सचे तातडीने सर्वेक्षण करून ती मजबूत झाकणांनी बंद करावीत. ज्या ठिकाणी तात्काळ दुरुस्ती शक्य नसेल, तेथे बॅरिकेड्स उभारून रात्री स्पष्टपणे दिसतील असे धोक्याचे सूचना फलक लावावेत. सर्व गृहनिर्माण संस्था आणि व्यावसायिक संकुलांना त्यांच्या परिसरातील मॅनहोल्स सुरक्षित ठेवण्याबाबत कडक सूचना द्याव्यात.

पावसाळ्यात अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी २४ तास कार्यरत हेल्पलाईन आणि तात्काळ कृती पथक सज्ज ठेवावे. राज्यातील एकाही बालकाला प्रशासकीय निष्काळजीपणामुळे जीव गमवावा लागू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यंत गांभीर्याने कार्यवाही करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच, करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सविस्तर ॲक्शन टेकन रिपोर्ट सात दिवसांच्या आत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत

## इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे मायलेज कमी होते; केंद्र सरकारची कबुली

वाहनांचे नुकसान हा समज चुकीचा

ई-२० पेट्रोल वापरल्यास वाहनांचा विमा रद्द होईल किंवा विमा कंपन्या क्लेम देणार नाहीत, अशा अफवा सध्या सोशल मीडियावर पसरत आहेत. यावर पुरी म्हणाले, विमा कंपन्यांनी आधीच स्पष्ट केले आहे की, वाहनधारकांना विम्याचा पूर्ण लाभ मिळेल. तसेच, इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांचे नुकसान होते, हा समज पूर्णपणे चुकीचा आणि तथ्यांवर आधारित नसल्याचे सांगत सरकारने नागरिकांना दिलासा दिला आहे.

इंजिनची क्षमता सुधारते : ई-२० पेट्रोलमुळे वाहनांच्या मायलेजमध्ये थोडी घट होऊ शकते; परंतु यामुळे गाडीचा पिकअप आणि इंजिनची क्षमता अधिक सुधारते.

विम्याची पूर्ण सुरक्षा : इथेनॉलमिश्रित इंधन वापरल्याने वाहनांच्या इन्श्युरन्स कव्हरेजवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, असे विमा कंपन्यांनी स्पष्ट केले आहे.

सर्व चाचण्यांनंतरच पुढील निर्णय : पेट्रोलमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त इथेनॉल मिश्रण करण्याचा निर्णय सर्व आवश्यक आणि कठोर तांत्रिक चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच घेतला जाईल.

पर्यावरणपूरक पाऊल : इथेनॉल मिश्रण ही एक वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित आणि पर्यावरणाला पूरक अशी मोहीम असून यामुळे देशाचे इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी होणार आहे.

# रोजगार हमीपलीकडे विकसित गावांच्या नव्या युगाची सुरुवात

## 'विकसित भारत – जी-राम-जी' कायदा ग्रामीण भारताच्या विकासाची व्याख्या बदलणार

दोन दशकांहून अधिक काळ ग्रामीण भारताच्या रोजगार सुरक्षेचा आधार ठरलेली मनरेगा योजना आता नव्या स्वरूपात पुढे आली आहे. 'विकसित भारत – जी-राम-जी' हा कायदा १ जुलै २०२६ पासून देशभर लागू झाला आहे. नुकताच २ जुलै रोजी या योजनेचा केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते देशव्यापी शुभारंभ करण्यात आला. पहिल्या दृष्टीक्षेपात हा बदल केवळ १०० दिवसांच्या रोजगार हमीऐवजी १२५ दिवसांची हमी देणारा वाटू शकतो; परंतु प्रत्यक्षात या कायद्याचा गाभा रोजगारापेक्षा गावाच्या विकास नियोजनात आहे. ग्रामीण भारताच्या विकासाची दिशा, ग्रामपंचायतींची भूमिका आणि विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची पद्धत बदलण्याचा हा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

या कायद्यातील सर्वांत मोठा बदल म्हणजे 'विकसित ग्रामपंचायत आराखडा'. आजपर्यंत अनेक गावांमध्ये विकासकामे उपलब्ध निधी किंवा विभागीय योजनांनुसार निश्र्चित केली जात होती. आता प्रत्येक गावाने स्वतःच्या गरजा ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून पुढील काही वर्षांसाठी विकास आराखडा तयार करायचा आहे. गावात पाण्याची टंचाई कोठे आहे, कोणत्या शेतकऱ्यांना सिंचनाची गरज आहे, कुठे शेततळी आवश्यक आहेत, कोणत्या वस्तीला रस्ता हवा, कुठे वृक्षलागवड करायची, पशुपालन, रेशीम उद्योग, मत्स्यव्यवसाय, महिला बचत गट, युवकांचा कौशल्य विकास, तसेच हवामान बदलाशी सुसंगत कामे, या सर्व बाबींचा विचार एकाच आराखड्यात केला जाणार आहे. म्हणजेच आता ही केवळ 'काम शोधून देणारी योजना' न राहता 'विकास नियोजनावर आधारित रोजगार' ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे.

या कायद्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध विभागांच्या योजनांचा समन्वय. आतापर्यंत कृषी, जलसंधारण, ग्रामविकास, वन, पशुसंवर्धन, पंचायत राज, महिला व बालविकास आदी विभागांच्या योजना स्वतंत्रपणे राबवल्या जात होत्या. परिणामी, अनेकदा एकाच गावात विविध विभागांकडून कामे झाली; मात्र त्यांच्यात परस्पर सुसंगती नव्हती. आता 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' हा सर्व योजनांसाठी समान विकास आराखडा ठरणार आहे. त्यामुळे निधीचा अधिक परिणामकारक वापर होईल आणि निर्माण होणाऱ्या मालमत्ता दीर्घकाळ उपयुक्त ठरतील. हा बदल केवळ प्रशासकीय नसून विकासाच्या विचारपद्धतीतील मूलभूत परिवर्तन आहे.




ग्रामीण मजुरांच्या दृष्टीनेही हा कायदा महत्त्वाचा आहे. रोजगाराची कायदेशीर हमी १०० दिवसांवरून १२५ दिवसांपर्यंत वाढविण्यात आली आहे. कामाची मागणी करूनही विहित मुदतीत रोजगार उपलब्ध झाला नाही, तर बेरोजगारी भत्त्याची तरतूद कायम ठेवण्यात आली आहे. मजुरी वेळेत देणे बंधनकारक करण्यात आले असून विलंब झाल्यास भरपाई देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. महाराष्ट्रासाठी चालू आर्थिक वर्षातील दैनंदिन मजुरी ३१७ रुपये निश्र्चित करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्न सुरक्षेला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे.

या कायद्यामुळे ग्रामसभेचे महत्त्वही लक्षणीयरीत्या वाढणार आहे. कोणती कामे करायची, कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे आणि गावाचा विकास कोणत्या दिशेने करायचा, याचा निर्णय आता ग्रामसभेतील चर्चेतून होणार आहे. लोकसहभागाशिवाय 'विकसित ग्रामपंचायत आराखडा' प्रभावी ठरू शकत नाही. त्यामुळे ग्रामसभा ही केवळ औपचारिक बैठक न राहता गावाच्या विकासाचे निर्णय घेणारे प्रभावी व्यासपीठ बनणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, भूमिहीन आणि इतर वंचित घटकांच्या गरजांचाही विकास आराखड्यात स्वतंत्रपणे विचार करण्यावर भर देण्यात आला आहे.

या कायद्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तंत्रज्ञानाचा व्यापक वापर. डिजिटल नोंदणी, ई-केवायसी, ऑनलाइन उपस्थिती, जीआयएस-आधारित नियोजन, पोर्टलवर कामांची माहिती, निधी वितरणाचे डिजिटल व्यवस्थापन आणि सामाजिक लेखापरीक्षण यांमुळे पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे केवळ कामांची नोंद ठेवली जाणार नाही, तर निर्माण झालेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष उपयोग, गुणवत्ता आणि परिणामकारकताही तपासता येईल. गावांचा विकास डेटा-आधारित पद्धतीने मोजण्याची संधी या प्रणालीमुळे उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्राच्या दृष्टीने या कायद्यात मोठी संधी दडलेली आहे. राज्यात जलसंधारण, शेततळी, सिंचन विहिरी, फळबागा, रेशीम उद्योग, पशुपालन, चारागाह विकास, गाव तलावांचे पुनरुज्जीवन, ग्रामीण रस्ते आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती यांसारख्या कामांना चालना देता येईल. विशेषतः दुष्काळग्रस्त भागांत पाणलोट विकास, पश्र्चिम महाराष्ट्रात जलव्यवस्थापन आणि विदर्भ-मराठवाड्यात नैसर्गिक संसाधन संवर्धनासाठी या कायद्याचा प्रभावी वापर होऊ शकतो. रोजगार उपलब्ध करून देतानाच उत्पादनक्षम आणि शाश्र्वत मालमत्ता निर्माण करण्याची संधी हा या कायद्याचा सर्वांत मोठा लाभ ठरू शकतो.

'विकसित भारत' हे केवळ राष्ट्रीय घोषवाक्य नाही; त्याची सुरुवात प्रत्येक गावातून होणार आहे. त्यामुळे या कायद्याचे यश किती दिवस रोजगार मिळाला यावर नव्हे, तर प्रत्येक गावाने किती सक्षम विकास आराखडा तयार केला, किती शाश्र्वत मालमत्ता निर्माण केली, ग्रामसभेचा सहभाग किती वाढवला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किती सक्षम केली, यावर मोजले जाईल. रोजगार हमी ही या कायद्याची सुरुवात आहे; परंतु विकसित, सक्षम आणि आत्मनिर्भर गावांची निर्मिती हेच त्याचे अंतिम ध्येय आहे.

----------------

**सचिन अडसूळ**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# क्युबेक सोबतच्या भागीदारीतून राज्यात मोठी गुंतवणूक होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्र ही भारतामध्ये वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. देशात येणाऱ्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ४० टक्के परकीय गुंतवणुक ही महाराष्ट्रात येते. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, क्वांटम कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, खाण संशोधन या क्षेत्रामध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असून महाराष्ट्र क्युबेकसोबत या क्षेत्रासाठी भागीदारी करण्यास तयार आहे. या भागीदारीतून राज्यात निश्चितच मोठी गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

कॅनडातील क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळासमवेत झालेल्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०१८ मध्ये मॉन्ट्रियल येथे भेट दिली असता, त्यावेळी माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीनीकरणीय ऊर्जा, जैवतंत्रज्ञान तसेच आदिवासी कल्याण या विषयावर सामंजस्य करार करण्यात आले होते. हे करार महाराष्ट्र आणि क्यूबेकमधील संबंध अधिक दृढ असल्याचे प्रतीक आहे. तसेच नुकतेच कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या नेतृत्वात आलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाशी मुंबई भेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधी विषयी सकारात्मक चर्चा झाली होती.



नवी मुंबईमध्ये एज्युसिटी उभारण्यात येत असून या ठिकाणी सर्व आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे.या एज्युसिटीमध्ये क्यूबेकमधील विद्यापीठांनी आपली दालने उघडून 'मायनिंग इंजीनियरिंग' या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम विशेषत्वाने सुरू करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यामध्ये पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसह वाढवण बंदर प्रकल्पावर काम सुरू आहे. राज्यामध्ये गुंतवणूक करून उद्योग उभारण्यासाठी सुलभ धोरण आहे. राज्यातील गुंतवणूक ही दीर्घकालीन अनुकूल परिणाम देणारी आहे. 'क्रिटिकल आणि स्ट्रॅटेजिक मिनरल्स' मध्ये गुंतवणुकीची क्यूबेकमधील गुंतवणूकदारांना मोठी संधी आहे.

एरोस्पेस, डिफेन्स या क्षेत्रातही राज्यामध्ये मोठे काम होत आहे. नागपूर परिसरात 'डिफेन्स कॉरिडोर' ची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे एरोस्पेस क्षेत्राची परिसंस्था वेगाने विस्तारित होत आहे. त्याचप्रमाणे जीसीसी, डेटा सेंटर, बॅटरी स्टोरेज, कृषी मधील नवीन तंत्रज्ञान या क्षेत्रातही महाराष्ट्र पुढे येत आहे. त्यामुळे क्यूबेकने महाराष्ट्रसोबत दीर्घकालीन भागीदारी करावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.

क्युबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्री क्रिस्टोफर स्किट म्हणाले की, क्युबेक

## कॅनडातील क्युबेक प्रांतांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट

कॅनडामध्ये प्रगत राज्य असून कृत्रिम बुद्धिमत्ता, डाटा सेंटर, शिक्षण, क्रिटिकल मिनरल्स यामध्ये मोठी गुंतवणूक आहे. क्युबेक महाराष्ट्रासोबत विविध क्षेत्रांमध्ये भागीदारी करण्यास तयार आहे. पेन्शन फंड संस्थेच्या माध्यमातून भारतामध्ये मोठी गुंतवणूक करण्यास क्युबेकने तयारी केली आहे. भागीदारीच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यात रस असल्याचेही स्किट यांनी सांगितले.

यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबळगन, राजशिष्टाचार विभागाचे सचिव राजेश गवांदे, कॅनडातील क्यूबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहार सहाय्यक उपमंत्री डॉमिनिक मार्कोट्टे, सल्लागार श्रीमती लिया फर्टीन, संचालक मायकल कॉन्स्टेनिन, स्टीफन फलेक्कर, क्यूबेक प्रांतातील सीडीपीक्यू गुंतवणूक संस्थेचे भारतातील व्यवस्थापकीय संचालक नटराजन वेंकटरमण आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### चांढवे खुर्द येथे सर्विस रोड जलमय; पाण्यात अडकली एसटी, महामार्गाच्या निकृष्ट कामावर पुन्हा प्रश्नचिन्ह



दैनिक आपला विदर्भ

**रायगड । प्रतिनिधी :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाड तालुक्यातील चांढवे खुर्द येथे मुसळधार पावसामुळे सर्विस रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचून रस्त्याचे तलावात रूपांतर झाले. या पाण्यात पोलादपूरहून पुण्याकडे जाणारी एसटी बस तब्बल दीड ते दोन तास अडकून पडली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर राष्ट्रीय महामार्ग विभाग आणि कंत्राटदार कंपनीच्या निकृष्ट कामावर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### घोडबंदर मार्गावर विचित्र अपघात, संरक्षण कठडा तोडून ट्रक उड्डाण पुलावर लटकला, मोठी दुर्घटना टळली

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे। प्रतिनिधी :** घोडबंदर मार्गावरील कासारवडवली उड्डाणपुलावर शुक्रवारी पहाटे एक धक्कादायक अपघात घडला. १२ टन वजनाचे गूळ वाहून नेणाऱ्या ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रकने उड्डाणपुलावरील संरक्षण कठडा तोडला आणि तो अक्षरशः उड्डाणपुलाच्या कडेला लटकून राहिला. सुदैवाने ट्रक खाली कोसळला नाही. अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. या अपघातामुळे घोडबंदर मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली. घोडबंदर मार्ग हा ठाणे आणि गुजरातला जोडणारा अत्यंत वर्दळीचा मार्ग असून, या मार्गावर दररोज हजारो जड व अवजड वाहनांसह मोठ्या प्रमाणात खासगी आणि सार्वजनिक वाहतूक सुरू असते. परिसरातील वाढती लोकवस्ती आणि वाहनांची संख्या लक्षात घेता या मार्गावर नेहमीच मोठी वर्दळ असते. पुण्याहून डहाणूकडे १२ टन गूळ घेऊन जाणारा ट्रक शुक्रवारी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास कासारवडवली उड्डाणपुलावर पोहोचला. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक थेट उड्डाणपुलाच्या संरक्षण कठड्यावर आदळला. धडकेचा जोर इतका होता की कठड्याचा काही भाग तुटून ट्रकचा पुढील भाग उड्डाणपुलाच्या बाहेर लटकला. ट्रक अर्धवट अवस्थेत अडकून राहिल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. या उड्डाणपुलाखाली सध्या रस्ते रुंदीकरणाचे काम सुरू आहे. मात्र ट्रक पुलावरच अडकून राहिल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, वाहतूक पोलीस आणि महापालिकेच्या यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्रक सुरक्षितपणे हटविण्यासाठी क्रेनच्या सहाय्याने प्रयत्न सुरू करण्यात आले.

### शाळेच्या बसमधून घरी पोहोचेपर्यंत मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शाळेचीच: उच्च न्यायालय

बंगळुरू : शाळेच्या आवारात बसमध्ये चढल्यापासून ते पालकांपर्यंत सुरक्षितपणे पोहोचेपर्यंत मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची असते, असे कर्नाटक उच्च न्यायालयाने स्पष्ट केलंय. शाळेच्या बसमधील अपघातात एका विद्यार्थ्याचा डोळा निकामी झाल्याच्या घटनेबाबत एका खासगी शाळेच्या व्यवस्थापनावर दाखल केलेला खटला रद्द करण्यास न्यायालयाने नकार दिला. न्यायमूर्ती एम. नागप्रसन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने मंड्या जिल्ह्यातील मद्दूर येथील एका खासगी शाळेच्या व्यवस्थापन मंडळाने दाखल केलेल्या फौजदारी याचिकेवर सुनावणी केली. शाळेच्या बसमधील अपघातात इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्याचा डोळा निकामी झाल्याच्या घटनेवरून दाखल झालेला खटला रद्द करण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

### सीआरपीएफचे वाहन उलटले; सहा जवान जखमी

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यात शुक्रवारी सकाळी झालेल्या अपघातात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) वाहनाला अपघात होऊन सहा जवान जखमी झाले. श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील सोनमर्ग (गगनगीर) बोगद्याजवळ हा अपघात घडला. प्राथमिक माहितीनुसार, वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने ते रस्त्यावरून घसरून उलटले. अपघातात वाहनातील सहा सीआरपीएफ जवान जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि मदतकार्य सुरू करण्यात आले.जखमी जवानांवर घटनास्थळी प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना गुंड येथील सीआरपीएफ छावणीत तसेच जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

या अपघाताची स्थानिक पोलिसांनी नोंद घेतली असून, नेमके कारण काय होते याचा तपास सुरू करण्यात आला आहे. अपघातामागील कारणांचा शोध घेण्यासाठी संबंधित यंत्रणा सखोल चौकशी करत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांची जयंती 'जलसंधारण दिन' म्हणून साजरी करणार

- राज्यभर जलपूजन व विविध उपक्रम
- मृद व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय निर्गमित

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या पुढाकाराने माजी मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिवस, २१ ऑगस्ट हा यापुढे दरवर्षी शासकीय स्तरावर 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय मृद व जलसंधारण विभागाने निर्गमित केला.

सुधाकरराव नाईक यांचा स्मृतिदिन १० मे हा 'जलसंधारण दिन' म्हणून २००३ पासून साजरा केला जात होता. मात्र आता त्यात बदल करून त्यांच्या जन्मदिवशी २१ ऑगस्ट रोजी हा दिवस साजरा करण्यात येणार आहे.

**नाईक यांचे जलसंधारणातील योगदान**

१९९१ ते १९९३ या काळात सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असताना राज्यात तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी त्यांनी मोठ्या धरणांवर अवलंबून न राहता 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र देत पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणावर भर दिला होता. १९९२ साली स्वतंत्र जलसंधारण विभागाची स्थापना करून जलसंधारणाची लोकचळवळ उभी केली. रोजगार हमी योजनेचा वापर जलसंधारणाच्या कामांसाठी करून ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसोबतच जलसाठे निर्माण केले. माती नाला बांध, सलग समतल, नाला बंडींग यासारख्या छोट्या संरचनांवर त्यांनी भर दिला.

**२१ ऑगस्ट रोजी होणारे कार्यक्रम:**

- शासन निर्णयानुसार क्षेत्रीय स्तरावर पुढील कार्यक्रम घेण्यात येणार आहेत:
- सर्व शासकीय कार्यालयांत सुधाकररावजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व 'मृद व जलसंधारणाची शपथ'.
- विविध योजनांतर्गत कामांचे भूमीपूजन, लोकार्पण व जलपूजन.
- प्रिंट मीडिया, सोशल मीडिया व न्यूज वाहिन्यांद्वारे जलसंधारणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी.
- उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना पुरस्कार व प्रशस्तीपत्र देऊन गौरव.
- लोकसहभागातून व श्रमदानातून जलसंधारणाची कामे.

आयुक्त (मृद व जलसंधारण), महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, जल व भूमी व्यवस्थापन संस्था व सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी कार्यक्रमाचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, सुधाकरराव नाईक यांनी जलसंधारणाची जी चळवळ उभी केली, त्यामुळेच आज महाराष्ट्र दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांचे कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी २१



ऑगस्ट हा दिवस महत्त्वाचा ठरेल.

शासन निर्णय - https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/Marathi/202607031621336126.pdf

### चेन्नईच्या भक्ताची शिर्डी साई बाबांना अनोखी भेट : अर्पण केला सुवर्ण शंख

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी । प्रतिनिधी :** शिर्डीतील साई बाबांच्या चरणी चेन्नईच्या भक्तानं १०० ग्रॅम सोनाचा मुलामा असलेला शंख दान केला आहे. या शंखावर आकर्षक नक्षीकाम करण्यात आलेलं असून त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे. या शंखाची किंमत १३ लाख २७ हजार ९०० रुपये इतकी आहे. जी लक्ष्मी कांता असं या चेन्नीईतील साईभक्ताचं नाव आहे. जी लक्ष्मी कांता यांनी गुरुवारी शिर्डीतील साई मंदिराला भेट देत हा शंख दान केला आहे, अशी माहिती शिर्डी साई मंदिराचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

हा शंख दान केल्याबद्दल साईभक्त जी लक्ष्मी कांता यांचा मंदिराच्या वतीनं सन्मान करण्यात आला आहे.

साई बाबांवरील निस्सिम भक्तीमुळे दान केला सुवर्ण शंख : जी लक्ष्मी कांता यांनी सांगितलं की, ''साईबाबांवर गेल्या तीन दशकांपासून अखंड श्रद्धा आहे. सुमारे ३० वर्षांपूर्वी माझ्या आयुष्यात अत्यंत कठीण काळ सुरू असताना मला साईबाबांचं बोलावणं आलं. तेव्हापासून मी दरवर्षी न चुकता शिर्डीत येऊन साईबाबांचं दर्शन घेते. साईबाबांवरील निस्सीम श्रद्धेपोटी मी दरवर्षी सलग १०८ दिवस पायात चप्पल न घालता कडक व्रत पाळते. साईबाबा प्रत्येक कठीण प्रसंगात आपल्याला मार्गदर्शन करतात. अगदी स्वप्नात येऊनही योग्य-अयोग्याची जाणीव करून देतात, असा माझा ठाम विश्वास आहे. साईबाबांच्या इच्छेशिवाय आपल्या आयुष्यात कोणताही महत्त्वाचा निर्णय मी घेत नाही. साईबाबांकडून मिळालेल्या कृपेनंच मी आनंदी राहून गरजू लोकांना मदत करू शकते. मी अर्पण केलेला सुवर्ण शंख हे केवळ मौल्यवान दान नसून साईबाबांप्रती असलेल्या अथांग भक्तीचं प्रतीक आहे, असं मी मानते.''

### सौरऊर्जेकडे पश्चिम रेल्वेचा मोठा टप्पा; मुंबई विभागाची क्षमता ८.५३ मेगावॅट, वर्षाला १३.४ कोटींची बचत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई। प्रतिनिधी :** वाढत्या वीज दरांच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचा हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरणार आहे. मुंबई विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात २,६०७ किलोवॅट क्षमतेचे नवीन रूफटॉप सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. पर्यावरणपूरक ऊर्जा वापराला चालना देत पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाने सौरऊर्जा निर्मितीत महत्त्वाची प्रगती केली आहे. विभागातील रूफटॉप सौर प्रकल्पांची एकूण क्षमता आता ८.५३ मेगावॅट इतकी झाली असून, या प्रकल्पांमुळे दरवर्षी १३.४ कोटी रुपयांहून अधिक वीज खर्चाची बचत होणार आहे.

२०२५-२६ मध्ये नव्या प्रकल्पांची भर

२०२५-२६ या आर्थिक वर्षात पश्चिम रेल्वेने २,६०७ किलोवॅट क्षमतेचे नवीन रूफटॉप सौर प्रकल्प सुरू केले आहेत. त्यामुळे विभागाची एकूण सौरऊर्जा क्षमता ८.५३ मेगावॉटपर्यंत पोहोचली आहे. वाढत्या वीजदरांच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर ठरणार आहे.

# हरित वाशीमचा निर्धार; नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या हस्ते वृक्षारोपण

## कृषी दिन व जिल्हा निर्मिती दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश; 'प्रत्येकाने एक झाड लावून ते जगवावे'

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम । प्रतिनिधी :** कृषी दिन आणि जिल्हा निर्मिती दिनाचे औचित्य साधत वाशीम नगर परिषदेच्या वतीने वृक्षारोपण मोहिमेचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या संकल्पनेतून आणि नेतृत्वाखाली नगर परिषद परिसरात विविध देशी व सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी स्वतः वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. ''वाढत्या तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. वाशीमला हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक शहर बनविण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे,'' असे आवाहन त्यांनी केले.

मुख्याधिकारी मुंढे यांनीही वृक्षारोपणात सहभाग घेत झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, असे सांगितले. या उपक्रमात नगर परिषदेचे पदाधिकारी, सदस्य, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेत वृक्षसंवर्धनाचा निर्धार व्यक्त केला.

पर्यावरण संवर्धनाला चालना देत वाशीम शहर अधिक हिरवेगार व शाश्वत विकासाच्या दिशेने नेण्याच्या नगर परिषदेच्या प्रयत्नांतील हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.





# लोकसंख्या वाढते, नोकऱ्या कमी होतात; विधानसभेत सरकारच्या रोजगार धोरणावर आमदार सिद्धार्थ खरात यांचा जोरदार प्रहार; युवकांच्या भविष्याशी तडजोड मान्य नाही

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी** : पावसाळी अधिवेशनात बेरोजगारीच्या गंभीर प्रश्नावर आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरकारला धारेवर धरत नियमित पदभरती वाढविणे, कंत्राटी भरती बंद करणे आणि सुशिक्षित बेरोजगारांसाठी ठोस रोजगार धोरण राबविण्याची जोरदार मागणी केली. राज्याचा आर्थिक विकास हा सर्वसामान्य युवकांपर्यंत पोहोचत नसल्याची टीका करत त्यांनी सरकारच्या रोजगार धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

अशासकीय विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना खरात म्हणाले की, महाराष्ट्राची लोकसंख्या सुमारे १३ कोटींच्या घरात पोहोचली असून लाखो सुशिक्षित युवक रोजगारासाठी संघर्ष करत आहेत. राज्याचा जीडीपी वाढत असल्याचे सांगितले जाते, मात्र त्या विकासाचा लाभ युवकांना रोजगाराच्या स्वरूपात मिळत नसल्याचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

लोकसंख्या वाढत असताना शासनातील नियमित पदे मात्र कमी होत आहेत. सन २००१ नंतर अनेक विभागांतील पदरचना (आकृतीबंध) वाढविण्याऐवजी कमी करण्यात आली. शासनाच्या जबाबदाऱ्या वाढत असताना पदभरती घटत जाणे ही चिंतेची बाब आहे, असे ते म्हणाले.

कंत्राटी भरतीवर टीका करताना त्यांनी सांगितले की, शासनाच्या विविध विभागांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शोषण होत आहे. कमी वेतन, नोकरीची असुरक्षितता आणि कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याची कोणतीही हमी




नसल्याने हजारो कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधारात असल्याचे त्यांनी नमूद केले. कंत्राटी भरतीची पद्धत बंद करून पात्र कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घ्यावे, अशी त्यांनी मागणी केली.

याशिवाय शासनाने भांडवली विकासाबरोबरच ह्यूमन कॅपिटलमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी, ग्रामीण भागात कृषीपूरक उद्योगांना चालना द्यावी, एमआयडीसीचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, तसेच पोलीस आणि इतर शासकीय विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नियमित भरती करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

शिक्षण आणि रोजगार यामधील दरी कमी करण्यासाठी कौशल्याधारित शिक्षणाला रोजगाराशी जोडणारे नियोजन आवश्यक असल्याचे सांगत, डी.एड., बी.एड., फार्मसी आणि इतर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या युवकांना पुरेशा रोजगाराच्या संधी उपलब्ध न झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

राज्यातील बेरोजगारीचा प्रश्न हा केवळ राजकीय विषय नसून सामाजिक आणि आर्थिक आव्हान असल्याचे नमूद करत, या प्रश्नाचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मांडलेल्या अशासकीय विधेयकाला आपण पूर्ण पाठिंबा देत असल्याचेही त्यांनी सभागृहात स्पष्ट केले.

## मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर अभियानासाठी नियोजन बैठक संपन्न

**कोल्हापूर । प्रतिनिधी** : मुख्यमंत्री सचिवालयांतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबई यांच्या समन्वयाने राज्यभर १ ते ३१ जुलै या कालावधीत 'मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक पार पडली. या अभियानांतर्गत नागरिकांसाठी मोफत संपूर्ण आरोग्य तपासणी, विविध केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांबाबत व्यापक जनजागृती, रक्तदान शिबिरे, आभा कार्ड नोंदणी तसेच आवश्यक आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाशी संलग्न रुग्णालये, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत रुग्णालये, सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालये, एचएलएल यंत्रणा, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न वैद्यकीय महाविद्यालये, अन्न व औषध प्रशासन तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या समन्वयातून हे अभियान राबविण्यात येणार आहे.

## हाफकिनचे खासगीकरण होणार नाही! : मंत्री झिरवाळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली 'हाफकिन' संस्था कोणत्याही परिस्थितीत खासगीकरणाच्या मार्गावर नेली जाणार नाही. तसेच संस्थेच्या बळकटीकरणासाठी आणि सद्यस्थितीतील अडीअडचणींवर तोडगा काढण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिकारी व आमदारांची एक विशेष बैठक बोलावण्यात येईल,'' अशी ग्वाही अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

प्रश्नोत्तराच्या तासात काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी हाफकिनच्या खासगीकरणाच्या हालचालींवरून सरकारला प्रश्न विचारले होते. यावर उत्तर देताना सरकारने विरोधकांचे आरोप फेटाळत या संस्थेचे शासकीय अस्तित्व कायम राखण्याचे आश्वासन दिले. वडेट्टीवार म्हणाले, ''हाफकिन संस्थेच्या खासगीकरणाचा विषय यापूर्वीही चर्चेत आला होता. सुरुवातीला सरकारने या संस्थेची एक इंचही जमीन कोणाला दिली नसल्याचा दावा केला होता. मात्र, त्यानंतर टाटा समूहाला संशोधन केंद्रासाठी पाच एकर जमीन कराराद्वारे दिल्याचे स्पष्ट झाले. सरकारच्या या दाव्यांमध्ये आणि प्रत्यक्ष कृतीत मोठी विसंगती असून, या संपूर्ण व्यवहारात पारदर्शकता असणे अत्यंत आवश्यक आहे.'' हाफकिनला अत्यंत आवश्यक असलेल्या 'त्रिवेणी लस' निर्मितीसाठी आणि अद्ययावत यंत्रसामग्रीसाठी सुमारे १५० कोटी रुपयांच्या निधीची गरज



आहे. जर अवघ्या १५० कोटी रुपयांच्या मर्यादित गुंतवणुकीमुळे ही ऐतिहासिक संस्था स्वत:च्या पायावर सक्षम उभी राहू शकत असेल, तर मग सरकारच्या मालकीच्या तब्बल १ हजार ५०० कोटी रुपयांच्या मौल्यवान मालमत्तेवर आणि जमिनीवर खासगी कंपन्यांची नजर का आहे? यात कोणाचे खासगी हितसंबंध गुंतले आहेत?'' असा सवाल करत सरकारने याबाबतची आपली अधिकृत भूमिका सभागृहात जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी लावून धरली.

विरोधकांचा वाढता आक्षेप आणि हाफकिनच्या जमिनीवरून उपस्थित झालेल्या प्रश्नांची दखल घेत मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, ''हाफकिन ही राज्याची स्वायत्त आणि महत्त्वाची संस्था असून तिचे खासगीकरण करण्याचा कोणताही विचार सरकारचा नाही. वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेले मुद्दे आणि संस्थेच्या सक्षमीकरणासाठी लागणारा निधी यावर मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेतली जाईल,'' असे सांगत मंत्र्यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

# सर्पदंशाने चिमुकल्या राजचा दुर्दैवी अंत


## शाळेचा पहिलाच दिवस ठरला आयुष्यातील अखेरचा; उपचारासाठी नेत असतानाच मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव । प्रतिनिधी** : मेहकर तालुक्यातील राजगड येथे सर्पदंशामुळे अवघ्या सहा वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी (३ जुलै) मध्यरात्री घडली. उपचारासाठी दवाखान्यात नेत असतानाच चिमुकल्या राजची प्राणज्योत मालवली. शाळेचा पहिलाच दिवस आनंदात घालवलेल्या राजचा दुसऱ्याच दिवशी झालेला मृत्यू संपूर्ण गावाला चटका लावून गेला असून राजगड गावावर शोककळा पसरली आहे.

राजगड येथील अभिषेक राठोड यांचा सहा वर्षीय मुलगा राज राठोड याला २ जुलै रोजी डोणगाव येथील जीवन विकास कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश देण्यात आला होता. शाळेचा पहिला दिवस आनंदात पार पडल्यानंतर घरी परतलेल्या राजने आईला शाळेतील गमती-जमती सांगितल्या आणि रात्री आई व लहान बहीण अक्षरासोबत झोपी गेला.

मध्यरात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने घरात हवा यावी म्हणून दरवाजा उघडा ठेवण्यात आला. रात्री सुमारे एकच्या





सुमारास राज अचानक रडू लागला. त्याच्या पायावर चावल्याची खूण दिसल्याने सुरुवातीला उंदीर किंवा अन्य प्राण्याने चावल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. मात्र काही वेळातच त्याच्या पायाचा रंग निळसर होऊ लागला आणि वेदना तीव्र झाल्याने कुटुंबीयांनी तातडीने उपचारासाठी डोणगावकडे धाव घेतली. दुर्दैवाने दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच रस्त्यात राजचा मृत्यू झाला.

घटनेनंतर घराची पाहणी केली असता, राजला दंश करणारा साप पलंगाजवळील एका खोक्यात लपून बसलेला आढळून आला. गावकऱ्यांनी तो साप पाहून प्रशासनाला माहिती दिली.

एका दिवसापूर्वीच शाळेच्या नव्या प्रवासाची स्वप्ने डोळ्यांत घेऊन शाळेत गेलेल्या निष्पाप राजवर काळाने अशी झडप घातल्याने संपूर्ण राजगड गाव हळहळ व्यक्त करत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# कट प्रॅक्टिस खपवून घेतली जाणार नाही

## शासकीय रुग्णालयांवर विश्वास वाढवा : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : राज्यातील शासकीय आरोग्य सेवेत कट प्रॅक्टिस, निष्काळजीपणा आणि रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविण्याचे प्रकार कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. अशा प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या अधिकारी, ईएमएस समन्वयक व संबंधित कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला.

मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित राज्यस्तरीय आढावा बैठकीत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत आरोग्य यंत्रणेला कठोर निर्देश दिले. बैठकीस आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

यावेळी मंत्री आबिटकर म्हणाले की, १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. मात्र, काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांकडे पाठविल्याच्या तक्रारी गंभीर असून, मागील सहा महिन्यांतील रेफरल डेटाची तपासणी करून अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश देताना त्यांनी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी व अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. रुग्णांना अनावश्यकपणे खासगी रुग्णालयांकडे पाठविल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित केली जाईल.

यासंदर्भात प्रत्येक जिल्ह्याने सविस्तर सर्वेक्षण करून शासनाकडे अहवाल सादर करावा, असेही त्यांनी सांगितले. शासकीय आरोग्य संस्थांमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध राहावी यासाठी नियमित देखरेख ठेवण्याचे निर्देश देताना, शासनाकडून आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध असूनही कामात दिरंगाई अथवा निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आरोग्य संवाद यात्रा अंतर्गत १५ जूनपासून राज्यभर सुरू असलेल्या पाहणी मोहिमेच्या माध्यमातून उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि गावपातळीवरील आरोग्य समित्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष तपासणी केली जात असून, आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्हास्तरावर अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देशही दिले.



गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवण्याचे आदेश देताना कालबाह्य समित्या कायम ठेवण्याचा प्रकार सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यमान सरपंच व सदस्यांचा समावेश करून समित्यांचे नियमित कामकाज सुरू ठेवण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय, दर तीन महिन्यांनी आमदारांच्या उपस्थितीत होणाऱ्या जिल्हास्तरीय आरोग्य आढावा बैठकींना सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे.

या बैठकींचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याआधारे पुढील कार्यवाही केली जाईल. राज्यातील प्रत्येक नागरिकाला विश्वासार्ह, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणेने अधिक संवेदनशीलतेने आणि उत्तरदायित्वाने काम करावे, असे आवाहन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी बैठकीच्या शेवटी केले.

## वृत्तविशेष...

### गडचिरोलीत स्मार्ट मीटरचा 'स्मार्ट' धक्का; घरगुती ग्राहकाच्या हाती महिन्याला तब्बल ४ लाख ६९ हजार रुपयांचे वीज बिल

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली** : गडचिरोलीत महावितरण कंपनीच्या स्मार्ट मीटरचा 'स्मार्ट' धक्का समोर आला आहे. एका सर्वसामान्य घरगुती ग्राहकाच्या हाती तब्बल ४ लाख ७९ हजार ६० रुपयांचे वीज बिल पडल्याने वीज वितरण कंपनीच्या कारभाराप्रती प्रचंड असंतोष पसरलाय. देसाईगंज तालुक्यातील कुरुड येथील रामदास ठाकरे असे ग्राहकाचे नाव आहे. ठाकरे हे दरमहा अवघे एक ते दीड हजार रुपये बिल भरत असताना एका महिन्यात २१ हजार ५१ युनिट वीज वापर झाल्याची नोंद करण्यात आली आणि तब्बल ४ लाख ६९ हजार ६० रुपयांचे बिल देण्यात आले. त्यामुळे स्मार्ट मीटरच्या अचूकतेवर आणि महावितरणच्या बिलिंग प्रणालीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, एकीकडे स्मार्ट मीटरवरून विरोध होत असताना या प्रकारामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. तर हा प्रकार समोर येताच गडचिरोली विभागाचे कार्यकारी अभियंत्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची कान उघडणी करत वीज बिलात दुरुस्ती केली. तसेच ३ हजार ५६० चे नवे बिल दिले आहे.

या तांत्रिक चुकीमुळे हा प्रकार घडल्याचे गडचिरोली विभागाचे कार्यकारी अभियंता एच. पी. पारेख यांनी म्हटले आहे.

माओवादविरोधी लढ्यातील धाडस, शौर्य आणि उल्लेखनीय कामगिरीचा गडचिरोली पोलीस दलाला पुन्हा एकदा मोठा सन्मान मिळाला आहे. गडचिरोलीतील पाच सहाय्यक पोलीस निरीक्षकांना थेट पोलीस निरीक्षकपदी वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली आहे. मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात झालेल्या पिपिंग समारंभात पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते त्यांच्या खांद्यावर पोलीस निरीक्षकपदाची चिन्हे चढवण्यात आली. विशेष म्हणजे, गडचिरोली पोलीस दलातील आतापर्यंत तब्बल ४०४ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वेगवर्धित पदोन्नतीचा मान मिळाला असून, पोलीस दलाच्या शौर्य आणि कर्तव्यनिष्ठेची ही आणखी एक अभिमानास्पद नोंद ठरली आहे.

### उबाठा गट आता केवळ तीनच जणांचा प्रायव्हेट लिमिटेड पक्ष भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : संजय राऊत, तुमच्या पक्षात लोकशाही आहे का याचे आधी उत्तर द्या. उबाठा गटात कुठेही लोकशाही शिल्लक नाही. मुळात लोकशाही असायला तुमच्याकडे लोकच शिल्लक राहिलेले नाहीत. उबाठा हा उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत एवढ्या तीन लोकांचा प्रायव्हेट लिमिटेड पक्ष झाला आहे. नितेश राणे यांनी वर्णन केल्याप्रमाणे उबाठा गटाचा आता बचत गट झालाय. बचत गटातही तुमच्या पक्षापेक्षा जास्त सभासद असतात. त्यामुळे लोकशाहीच्या गप्पा संजय राऊतांनी करू नयेत, असा घणाघात भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शुक्रवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

न्यायालयाचा लिखित निकाल हाच अधिकृत असताना सामनाचे कार्यकारी संपादक जनाब संजय राऊत उच्च न्यायालयाच्या निकालावर टिप्पण्या करताहेत. संपादक होण्याची बौद्धिक क्षमता नसल्यानेच उद्धवजींनी त्यांना संपादक केले नसेल. तुम्हाला अग्रलेख लिहायचा असेल तर केंद्रात काँग्रेस सरकार असताना सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयचे पिंजरा, पोपट असे उल्लेख केले होते, त्याबद्दल लिहा. हे जनतेच्या हितासाठी काम करणारे सरकार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सातत्याने जनतेत असतात. तुमच्यासारखे घरात बसून मातोश्री दोन बांधण्याचे काम आमचे नेते करत नाहीत. तुम्ही आधी आपला पक्ष सांभाळा आणि मग सरकारवर टीका करा, असे श्री. बन यांनी सुनावले.

चेंबूर अथवा कालची साकीनाका येथील घटना अतिशय दुर्दैवी आणि संवेदनशील असल्याचे सांगून श्री. बन म्हणाले, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आ. अमित साटम यांच्या वक्तव्याचा विपर्यास करण्याचा प्रयत्न झाला. दुर्घटनेबद्दल असंवेदनशीलता दाखवण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. आम्ही संबंधित महापालिका अधिकाऱ्यांचे निलंबन केले. कालच्या प्रकरणात कंत्राटदारावरही गुन्हा दाखल करण्याची हिंमत आम्ही दाखवली. संजय राऊत, तुमचा पक्ष सत्तेत असताना तुम्ही एकातरी अधिकाऱ्यावर कारवाई केली होती का? घटना घडायच्या, माणसे मरायची, त्यासाठी कोणालाही जबाबदार धरले जात नव्हते. महापालिकेत पंचवीस वर्षाचा कारभार करताना तुम्ही कायम अधिकाऱ्यांना पाठीशीच घालत होता. मुंबईत शेकडो माणसे मरत असताना तुम्ही मात्र मातोश्रीमध्ये बसून होता. आमचे अधिकारी, नगरसेवक, मुंबईच्या महापौर स्वत: फिल्डवर राहून काम करताहेत. मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे अतिशय उत्तम काम करताहेत.